# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील १. इलेक्ट्रॉनिक्स, २.संगणक व माहितीशास्त्र, ३.व्यवस्थापनशास्त्र व ४.मानसशास्त्र या विभागात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नविन ४ वर्षीय हॉनर्स पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास दि. २५.०७.२०२५ रोजी संपन्न झालेल्या मा.व्यवस्थापन परिषदेच्या नियमित बैठकीमध्ये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सदरील ०४ वर्षीय हॉनर्स पदवी अभ्यासक्रम शिकविण्यासाठी एकत्रित वेतनावर कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक नियुक्त करण्यासाठी विद्यापीठाने जाहिरात क्र.आस्था/विभाग/ ०२/ २०२५ दि.२८.०७.२०२५ रोजी प्रकाशित करण्यात आली होती. सदरील जाहिरातीनुसार दिनांक ०२-०८-२०२५ रोजी पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्यास व दि. ०४.०८.२०२५ रोजी पर्यंत हार्डकॉपी आस्थापना विभागामध्ये जमा करण्यास कळविण्यात आले होते. दि. ०४.०८.२०२५ रोजीपर्यंत आस्थापना विभागात प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी समितीने छाननी करुन पात्र/अपात्र झालेल्या अर्जदाराची यादी तयार करण्यात आलेली आहे.

सदरील जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र व अपात्र झालेल्या अर्जदारांची यादी सदरील परिपत्रकासोबत जोडण्यात आलेली असून सदरील यादीप्रमाणे पात्र झालेल्या अर्जदारांनी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या दिनांक व वेळेस ऑनलाईन TET Exam 2025 परीक्षेसाठी उपस्थित रहावे.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४ )(
संदर्भ क्र. आस्था/विभाग/२०२५/23 )(
दिनांक ०७-०८-२०२५ )(

कुलसचिव

या परिपत्रकाची एक प्रत संचालक, युनिक यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सदरील परिपत्रक पात्र झालेल्या सर्व अर्जदारांना ऑनलाईन TET Exam 2025 परीक्षेसाठी उपस्थित राहणेबाबत एसएमएसद्वारे कळविण्यात यावे.